पुढील उलट तपास श्री खेळकर वकील अर्जदारातर्फे :

०९. हे म्हणने खरे आहे की ९० दिवसाच्या सुटया नंतरही अर्जदार याने आमचेकडे सेवा केली. अर्जदार याने ९० दिवसाच्या सुटया संपल्यानंतरही त्याने सेवा केली तेव्हा आम्ही अर्जदाराला सेवा करु नका याबाबत पत्र दिले नाही.

प्र : आजारी रजा उपभोल्यानंतर तूम्ही अर्जदाराला रिलीव्ह होण्याचे पत्र दिले नाही ?

ऊ : होय, कारण अर्जदाराची सेवा निवृत्तीची तारीख ३०.०६.२०२० ही होती.

हे म्हणने खरे आहे की आजारी रजा संपल्यानंतर अर्जदार हे सींदेवाही शाखेमध्ये काम करीत होते. हे म्हणने खरे आहे की मी सींदेवाही शाखा प्रमुखाना अर्जदाराला काम करु देवू नये म्हणून पत्र दिले नाही. साक्षदार नंतर सांगतो की याबाबत मला माहीती नाही. हे मला माहीत नाही की अर्जदाराचा ९० दिवसाच्या वर पगार देवू नये असा कार्यकारी मंडळाने ठराव केला होता. हे म्हणने खरे आहे की आम्ही अर्जदाराला कार्यकारी मंडळ सभा दि. ३१.७.२०२० चे ठराव क्र. ११ बाबतची माहीती दिली नव्हती. हे म्हणने खरे आहे की वरील नमूद ठराव क्रमांक ११ बाबत नोटीस ऑफ चेंज बाबत कर्मचारी संघटनेला दिली नाही. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराने त्याच्या शिल्लक रजेच्या काळामध्ये बॅकेत काम केले आहे. हे म्हणने खरे नाही की अर्जदाराने शिल्लक रजेच्या काळामध्ये बॅकेत काम केले असल्यामुळे तो पगार मीळण्यास पात्र आहे. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराने संपूर्ण रजा उपभोगल्या असत्या तर अर्जदाराचे जागेवर ईतर कर्मचा–याने काम केले असते. हे म्हणने खरे नाही की ईतर कर्मचा–याने काम केले असते तर त्यास पगार दयावा लागला असता. हे म्हणने खरे नाही की

बॅकेला एकतर्फी ठराव करण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणने खरे नाही की आम्हाला गरीब अर्जदाराचे पैसे देणे नाही म्हणून मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण झाला.

फेर तपास नाही

माझे समक्ष

स्वा/–

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

दि. २२.०७.२०२४. कामगार न्यायालय, चंद्रपुर